# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय

१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं *dydpune@gmail.com* वेब साईट क्रमांक *www.dydepune.com*


कालमर्यादित

जा.क्र .उमाशि-२/शि.मा./पुवि/१४-१५/

दि : 24 NOV 2015

प्रति

प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
अहमदनगर/पुणे/सोलापूर

विषय :- कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक/शिक्षण सेवक वैयक्तीक मान्यता शिबीर मुदतवाढी बाबत...

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र संकीर्ण-१०९९/(२५५/९९)/माशि-२/ दि ६/९/१९९९
२) शासन निर्णय क्र एसएसएन-१००७/(३६५/०७)/माशि-२/ दि ६/२/२०१२
३) शासन निर्णय क्र संकीर्ण २०१२/(२०९/१२)/प्राशि-२/दि ६/९/२०१२
४) मा. शिक्षण संचालक यांचेकडील एचएससी/१५२०११/३१५५४/१२एचएस/३०४८ दि २५/३/२०१२
५) शासन निर्णय क्र .एसएसएन-१००८/(२००/०८)/माशि-२/दि २३/१०/२०१३
६) शासन निर्णय क्र एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दि २०/६/२०१४
७) शासन निर्णय क्र एसएसएन-२०१४/(१/१४)/टिएनटी-२/ दि १९/७/२०१४
८) शा.नि.क.संकीर्ण-२०११/(४४७/११)/(अ)प्राशि-३ दि ०२/०५/२०१२
९) मा.शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे समवेत राज्य शिक्षण संघटना यांच्या सोबत झालेली सहविचार सभा दिनांक १९.१०.२०१५
१०) या कार्यालयाचे पत्र दि. २९.१०.२०१५ व २१.११.२०१५

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, या कार्यालयाचे पत्र क्र १० व ११ अन्वये दि.२६.१०.२०१५ ते १०.११.२०१५ व दि.२३.११.२०१५ ते २८.११.२०१५ अखेर अहमदनगर/पुणे/सोलापुर जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक वैयक्तिक मान्यता देण्याबाबत शिबीर आयोजित करण्यात आलेले होते, सदर शिबीरामध्ये आवक झालेल्या नस्तींवर शिबीर कालावधीत कार्यवाही न झाल्यामुळे नस्तींवर कार्यवाही पुर्ण करण्याकरिता खालील प्रमाणे शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे, तरी नमुद वेळापत्रकानुसार संबधित जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी उपस्थित रहावे. सदर शिबीरामध्ये प्रतिनिधी उपस्थित न राहिल्यास शिबीरामध्ये आवक केलेल्या नस्ती वर मान्यतेबाबत कार्यवाही करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. ०२ मे २०१२ नंतर ज्या अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयाने ना हरकत प्रमाणपत्र न घेता पुर्णवेळ शिक्षक/शिक्षण सेवक नियुक्त केलेले व जाहिरातीसाठी परवानगी आवश्यक असलेल्या पदांबाबतचे प्रस्ताव आहेत या नियुक्त्यांना मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांच्या परवानगीची आवश्यकता आहे. ज्या कनिष्ठ महाविद्यालयाने अशा प्रकारचे प्रस्ताव अद्याप पर्यंत सादर केलेले नसतील त्यांनी दिनांक ०२.१२.२०१५ ते १५.१२.२०१५ अखेर खालील वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या जिल्हयानुसार सादर कराव्यात.

## शिबीराचे वेळापत्रक

वेळ :- सकाळी १०.०० ते २.०० दुपारी २.३० ते ५.००

| अ.क्र. | दिनांक | स्थळ | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | दि. ०२.१२.२०१५ ते ०४.१२.२०१५ | पुना कॉलेज, न्यु मोदी खाना, (कॅम्प) पुणे | सोलापूर |
| २ | दि. ०५, ०७ व ०८ डिसेंबर २०१५ | | अहमदनगर |
| ३ | दि. ०९.१२.२०१५ ते ११.१२.२०१५ | | पुणे |

सदरचे सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर -

११. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
१३. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे
१५. मा.उप संचालक, सामाजिक व न्याय विभाग, पुणे.

प्रत योग्य कार्यवाहीसाठी

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. अहमदनगर/पुणे/सोलापूर
/-यांनी शिबीराचे वेळापत्रक ठळक मुद्दे या बाबींना आपल्या जिल्हयाच्या स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी

२. प्राचार्य, संबंधीत शिबीर कार्यालय.
/- यांनी शिबीर मान्यता शिबीराच्या वेळी आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.